# राशिभविष्य - नोव्हेंबर, २०२१.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==================================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्यात्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. कारण आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. म्हणून आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास आम्हांस कळवावे.**

==================================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत वक्री हर्षल असून तो काही प्रमाणात शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असला तरी त्याच्यामुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी ,विक्षिप्त असा होण्याची शक्यता आहे. कशाचीही भीती वाटणार नाही, धाक, दडपण सहन होणार नाही. या राशीची लहान मुले तर अतिशय खोडकर, वांड, व्रात्य, हूड अशी झाली असण्याची शक्यता वाटते. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत राहू असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. तसेच त्याच्यामुळे आर्थिक चिंताही त्रस्त करण्याची शक्यता आहे. ह्या राशीचा सप्तम स्थानी तुळा राशीत रवि -बुध -मंगळ असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील, काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. हाती घेतलेल्या कार्यात अपयश येईल. संततिसुखात बाधा येईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात तो केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होईल व काही मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या सप्तम स्थानी असलेले मंगळ -बुध हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून येथील मंगळामुळे वैवाहिक जीवनातील सुखात विविध कारणांनी बाधा येईल. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या व्यवसायात गैरसमज,वाद, भांडणे संशय अशापैकी कारणांनी बाधा येईल. दुःख, भांडणे, वियोग अशापैकी घटना

घडतील व त्यामुळे मन अस्वस्थ राहील. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून तोही वैवाहिक जीवनातील सुखास बाधक होईल. कौटुंबिक जीवनात सतत भांडणे होतील. तसेच तो अनारोग्यकारक असून त्याच्यामुळे काही मंडळींना त्वचारोगाचा, काहींना रक्तविकाराचा तर काहींना मुखदंत विकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या भाग्यस्थानी धनु राशीत शुक्र असून त्याच्यामुळे सुसंगती लाभेल. काही मंडळींना गुरुकृपा प्राप्त होईल; तर काहींना प्रसिद्धी मिळेल. ऐषाराम लाभेल. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत गुरु व शनि असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होतील. येथील गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत जात आहे. तेथे वक्री नेपच्यून आहेच. हा नेपच्यून प्रतिकुल असून त्याच्यामुळे अर्थप्राप्तीस विलंब होणे, आर्थिक नुकसान होणे, आर्थिक घोटाळे होणे संभवते. कुमार्गी मित्रापासून मनस्ताप सहन करावा लागेल. त्यामुळे नैराश्य येईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात गुरु या लाभस्थानी आल्यावर परिस्थिती सुधारेल. विवाहेच्छूना विवाहयोग येईल. काहींना नवे मित्र मिळतील. धनलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने " श्रीगणपति अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत राहू असून त्याच्यामुळे सतत अपमान होण्याची शक्यता आहे. तसे घडले तर मनात सूडभावना प्रज्वलित होईल. जपा. त्याशिवाय या राहूमुळे काही मंडळींना वातविकाराचे आजार त्रस्त करतील. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत रवि -मंगळ -बुध असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. या सप्तम स्थानी केतू आहेच. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल, हितशत्रू पराभूत होतील, मनःशांती लाभेल. बुधामुळे धनलाभ होणे संभवते. तसेच कार्यसिद्धी होईल. पण मंगळामुळे उष्णताविकार बळावतील आणि काही

मंडळींना इजा होईल, अंगावर फोड येतील, काही मंडळींना रक्तविकाराचा तर काही  मंडळींना हृदयविकाराचा आजार त्रस्त  करील. तसेच काही मंडळींना अपप्रचाराचा मनस्ताप सहन करावा लागेल तर  काहींना
आर्थिक समस्या त्रस्त   करतील.  महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर
केंद्रस्थानी जात असल्याने भाग्योदयकारक होईल. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेला केतू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा  निर्माण करील.  या राशीच्या अष्टम स्थानी धनु राशीत शुक्र असून  त्याच्यामुळे कमी श्रमांत भरपूर धनलाभ  होईल.  ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते.  काहींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल.  या राशीच्या भाग्यस्थानी मकर या स्वराशीत शनि असून सोबत गुरु ग्रहही आहे, येथील गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत जात आहे. शनीमुळे प्रवासाचे योग येतील. गुरुमुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. महिन्याच्या उत्तरार्धात येथील गुरु या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल  व लाभदायक होईल.  या  राशीच्या दशम स्थानी  असलेला वक्री नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल  होईल; पण मनस्थिती अस्थिर राहील.  या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे काही मंडळींना सांपत्तिक अडचणी त्रस्त करतील. काहींना  जिवावरच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची  उपासना व श्रीहनुमान  उपासना अनुकुल होईल  व मनःशांती लाभेल.  दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा.  रात्री झोपी जाण्यापूर्वी  “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा,  ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय  नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोम सोमाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत रवि -मंगळ -बुध असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. रवि महिन्याच्या

पूर्वार्धात व मंगळ -बुध महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होतील. त्यामुळे कौटुंबिक त्रास, अनारोग्य, अपघात, संततीचे अनारोग्य व आचरणविषयक समस्या, नोकरीत वरिष्ठांचा जाच, नातेवाइकांपासून दुरावा, स्थावरसंबंधी त्रास अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर अनुकुल व दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल. षष्ठस्थानी असलेला केतूही अनुकुलच होईल. त्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होईल. हितशत्रू पराभूत होतील. केतूमुळे आरोग्य उत्तम राहील, सहकार्य लाभेल, आचारविचार उच्च होतील. मन उदार होईल व काही मंडळींना कीर्ती-प्रसिद्धी प्राप्त होईल. या राशीच्या सप्तम स्थानी धनु राशीत शुक्र असून त्याच्यामुळे विवाहितांना वैवाहिक जीवनात सुखसमाधान लाभेल. प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. येथील शुक्र दिनांक २१ पासून या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत जात आहे. त्या स्थानी प्रथमपासून स्वराशीत शनि असून सोबत गुरु ग्रहही आहे. शनि ग्रह आरोग्यविघातक होईल. त्याच्यामुळे दुःखदायक घटना घडतील. पण महिन्याच्या अखेरच्या दहा दिवसांत शुक्रामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. पण या राशीच्या वृद्ध मंडळींना हा शुक्र प्रतिकुलच होईल. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून महिन्याच्या उत्तरार्धात अष्टम स्थानी असलेला गुरु या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत येत आहे. येथील नेपच्यूनमुळे काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रहाची जोड मिळाल्यावर सहजपणे अधिकच प्रगती होईल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल असला तरी सर्व काही अनिश्चित असल्यामुळे निश्चित असे काय घडू शकेल ते सांगता येणार नाही. . त्याच्यामुळे मित्रांशी भांडणे होतील. पण अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत राहू असून तो लाभदायक होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळेल. पण वैवाहिक जीवनातील सुखास तो बाधक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. व रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे

पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी "ओम नमः शंकराय " तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत रवि -मंगळ -बुध हे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, कौटुंबिक भांडणे, त्रास, असमाधानकारक घटना, धननाश अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. या राशीच्या पंचम स्थानी केतू आहेच. हा केतू महिन्याच्या पूर्वार्धात अध्यात्म, गूढ संशोधन अशा कार्यास अनुकुल व प्रगतिकारक होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रहाचा संपर्क होताच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच काही मंडळींना पोटाचे अनारोग्य त्रस्त करील. या राशीच्या षष्ठ स्थानी धनु राशीत शुक्र असून या राशीच्या कलाकारांमध्ये उच्च कलागुण असूनही कलेत प्रगती होत नसल्याचा त्यांना अनुभव येईल. पण हा शुक्र दिनांक २१ पासून या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत गेल्यावर या राशीच्या विवाहेच्छूंना अनुकुल होईल. पण याच स्थानी स्वराशीत शनि असल्याने विवाहसंबंध जुळून येण्यात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत शनीसह गुरु ग्रहही असल्याने प्रेमसंबंध असणारांच्या प्रेमसंबंधात फारशी बाधा येणार नाही. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसाहक्काने धनलाभ होईल. पण या राशीच्या अष्टम स्थानी असलेला वक्री नेपच्यून जलभयकारक व विषभयकारक असून पाण्यापासून जपावे लागेल. तसेच बाहेरच्या उघड्यावरच्या खाद्यपदार्थांपासून दूर राहणे इष्ट होईल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येईल. तसेच शासकीय नोकरीत अधिकारपदावर असणारांना वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा निर्माण होईल. पण त्यांनी तो

मोह आवरावाच. नपेक्षा होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र या पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत रवि -मंगळ -बुध असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. त्यामुळे हा रवि महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल होईल. शिवाय महिन्याच्या उत्तरार्धात तो केतूसह असल्यामुळे व हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच असल्यामुळे अधिकच मनस्तापदायक होतील. जपा. तृतीय स्थानी तुळा राशीत असलेला बुध महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे, हितशत्रूंपासून त्रास होणे संभवते. पण मंगळ ग्रह अनुकुल होईल, व त्याच्यामुळे हिम्मत व महत्त्वाकांक्षा वाढेल, हातून काही कर्तबगारी घडून येईल. प्रवासयोग येईल. पण त्याच्यामुळे इजा होणेही संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी धनु राशीत शुक्र असून तो सर्व प्रकारच्या कलांचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्या सोबत गुरु ग्रहही आहे. येथील शनि दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल; पण त्याच्यामुळे अनारोग्य, वाद, भांडणे, गैरसमज होण्याचीच अधिक शक्यता आहे. शनिसह असलेला गुरु आरोग्यास अनुकुल असला तरी तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यावेळी तो विवाहेच्छूंना अनुकुल होईल, ज्यांचे प्रेमसंबंध जुळून आले असतील ते अधिक घट्ट होतील. काही युवक-युवतींना विवाहयोग येईल. काही मंडळींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. प्रवासयोग येईल. अर्थलाभ होणेही संभवते. पण या सप्तमस्थानी असलेल्या वक्री नेपच्यूनमुळे विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता आहे. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काही प्रमाणात अनुकुल व प्रगतिकारक होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी वृषभ

राशीत राहू असून तो या राशीच्या नोकरदार मंडळींना अनुकल होईल. विशेष करून या राशीच्या शासकीय नोकरदार मंडळींना बढती, अधिकारपद असे काही मिळू शकेल. क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीभगवान विष्णूची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीविष्णुसहस्नाम स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत रवि -मंगळ -बुध असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात प्रतिकुल होणार आहेत. रवि -मंगळ अनारोग्यकारक होतील व त्यांच्यामुळे उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. तसेच आर्थिक समस्या त्रस्त करतील, बुधामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते. पण हा बुध काही मंडळींना धनदायक होईल. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. त्या स्थानी केतूही आहेच.

या स्थानी आलेला रवि सर्व प्रकारे अनुकुल व लाभदायक होईल. पण येथील केतूमुळे महिन्याच्या सम्पूर्ण काळात कसल्या तरी मानसिक दुःखामुळे मन अस्वस्थ राहील. या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु राशीत शुक्र असून तो या राशीच्या शेतीवाडी असणारांना अनुकुल व लाभदायक होईल व सुखसमाधान आणि ऐषाराम लाभेल. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत शनि असून सोबत गुरु ग्रहही आहे. हे दोन्ही ग्रह वकिलीसारख्या चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व लाभदायक होतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात येथील गुरु या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत गेल्यावर आरोग्यदायक होईल; पण सोबत असलेल्या वक्री नेपच्यूनमुळे काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काही मंडळींना उगीचच आपल्याला कसला तरी भयंकर आजार होणार असल्याची भावना अस्वस्थ ठेवील. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो अपघातभयकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे प्रवासयोग येण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल

तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करतांना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि -मंगळ -बुध असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह शारीरिक मानसिक आरोग्य दृष्ट्या प्रतिकुल होतील. हट्टी, अहंकारी स्वभाव असणारांना अधिकच शरीरपीडा, दगदग सहन करावी लागेल. बुधामुळे मनस्थिती अतिशय चंचल होईल. त्यातून धननाश होणे, मित्रद्रोह होणे, कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत केतू असून महिन्याच्या उत्तरार्धात लग्नस्थानी असलेला रवि धनस्थानी वृश्चिक राशीत येत आहे. केतूमुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील व रवि ग्रह धनस्थानी आल्यावर त्यात अधिकच भर पडेल जपा. या राशीच्या तृतीय स्थानी धनु राशीत शुक्र असून त्याच्यामुळे काही मंडळींना भूमिलाभ, काहींना प्रतिष्ठा तर क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान मिळणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत शनि असून सोबत गुरु ग्रहही आहे. येथील शनि कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. पण गुरु ग्रहामुळे दिलासा मिळेल. काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार ही होणेही संभवते. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. येथील गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत जात आहे. या पंचम स्थानी कुंभ राशीत प्रथमपासून वक्री नेपच्यून आहेच. या नेपच्यूनमुळे मनस्थिती अतिशय भावनाशील होईल. अध्यात्मात रस असणारांना तो अनुकुल होईल महिन्याच्या उत्तरार्धात गुरु या स्थानी आल्यावर परिस्थितीत बदल होईल व सर्व सुखाचेच होईल. आध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. विद्यार्थी शैक्षणिक प्रगती करू शकतील. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या भागीदारीत गैरसमज, वाद, भांडण, संशय अशापैकी कारणांनी

भागीदारीत बाधा येईल. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे काही मंडळींना अचानक धनलाभ होण्याची शक्यता असली तरी त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी श्रीहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः" तारक मंत्राचा, यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत रवि -मंगळ - बुध हे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे शारीरिक, मानसिक अनारोग्य त्रस्त करील. त्याशिवाय शरीरपीडा, दगदग सहन करावी लागेल. तसेच त्यांच्यामुळे धननाश होणे, मित्रद्रोह होणे, काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणेही संभवते. येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. या राशीच्या प्रथम स्थानी केतू आहेच. हा केतू अनुकुल असून त्याच्यामुळे सुख, ऐषाराम लाभेल. पण तो वाहन -अपघातदर्शक असल्याने वाहन सावधानतेने चालवा, तसेच सतत सर्व ठिकाणी सावधान राहून आचरण करा. या राशीच्या धनस्थानी धनु राशीत शुक्र असून त्याच्यामुळे कौटुंबिक सुख लाभेल व धनलाभ होईल. या राशीच्या तृतीय स्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्या सोबत गुरु ग्रहही आहे. हे दोन्ही ग्रह वकिलीसारख्या चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होतील. शनीमुळे काही मंडळींना उत्तम, मनपसंत नोकरी किंवा अपेक्षित आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण या शनीमुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याचीही शक्यता आहे. येथील गुरु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत जाईल. या चतुर्थ स्थानी प्रथमपासून वक्री नेपच्यून आहेच. गुरूमुळे महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुख मिळेल, काहींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहारही होतील; पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या वक्री नेपच्यूनमुळे घरगुती घटनांमध्ये घोटाळे,

गैरसमज होणे संभवते. पण तो आध्यात्मिक उपासनेस अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो अनारोग्यकारक होईल. त्याच्यामुळे मनस्थिती चंचल होईल ' काही मंडळींना मुदतीचा ताप येणे संभवते. या राशीच्या मंडळींनी सतत अति विचार करत बसू नये. मेंदूला योग्य तेवढी विश्रांती द्यावी. नपेक्षा डोकेदुखी किंवा मेंदूविकार होऊ शकेल. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे सतत डोक्यात कपटी विचार येतील. तसेच हा राहू वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः;" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत रवि -मंगळ -बुध असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह
या राशीच्या मंडळींना काही प्रमाणात अनुकुल व लाभदायक होतील. लाभ स्थानी असलेला रवि महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल व लाभदायक होणार असल्याने या राशीच्या मंडळींनी - विशेष करून शासकीय सेवेत असणारांनी- जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व केवळ मनस्ताप देणाऱ्या घटनाच सहन कराव्या लागतील. या व्ययस्थानी प्रथमपासून असलेल्या केतूमुळे स्वभाव अति लहरी व भावनाशील होईल . लाभस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. तसेच अति कष्ट-परिश्रम करूनच अपेक्षित अर्थलाभ होईल. पण या मंगळामुळे या राशीच्या काही मंडळींना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणे संभवते. बुधामुळे सर्व सुखकारक तेच घडेल. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शुक्र असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील व कौटुंबिक जीवनातील सुखसमाधान

प्राप्त होईल. या राशीच्या धनस्थानी मकर या स्वराशीत शनि असून सोबत गुरुही आहे. पण गुरु कितीही अनुकुल असला तरी शनीच्या युतीत असल्याने हा शनी
मिळणाऱ्या सुखात अडचणी, अडथळे निर्माण करील. त्याच्यामुळे आर्थिक संकटे त्रस्त करतील. कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात येथील गुरु या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर प्रवासयोग येईल, या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रकाशित होईल. या राशीच्या तृतीय स्थानी प्रथमपासून वक्री नेपच्यून आहेच. या नेपच्यूनमुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग येतील. शिवाय तो अध्यामास व गूढ संशोधनास उपयुक्त होईल. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल व प्रगतिकारक होईल. काही मंडळींना अंतर्ज्ञानशक्ती प्राप्त होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे मनात सतत कावेबाज विचार येतील , हितशत्रू पराभूत होतील, तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी " ओम निऋतये नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी " ओम उदकाय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच स्वराशीत शनि असून सोबत गुरु ग्रहही आहे. येथील शनि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होईल व अनारोग्य , नैराश्य, कार्यअडथळे, कुटुंबातील प्रिय व्यक्तींचे स्थलांतर अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. पण या राशीच्या काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग संभवतात. येथील गुरूमुळे आरोग्यात सुधारणा होईल. बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण महिन्याचे अखेरचे दहा दिवस तो या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत जात आहे. तेथे प्रथमपासून वक्री नेपच्यून आहेच. त्या दहा दिवसांत कौटुंबिक जीवनात शुभ घटना घडतील, उत्तम अर्थप्राप्ती होईल, स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाढ होईल, पण येथील वक्री नेपच्यूनमुळे आर्थिक

संकटे येण्याची शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही, आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो कमिशन,दलाली व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत रवि ,मंगळ व बुध असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल; पण मंगळामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता आहे. बुधामुळे मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल,आर्थिक लाभ होतील. . या राशीच्या लाभस्थानी असलेला केतु अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या व्ययस्थानी धनु राशीत शुक्र असून त्याच्यामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. तसेच त्याच्यामुळे धनलाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “”शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ-** या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असल्यामुळे सध्या या राशीच्या मंडळींना उच्च बौद्धिक शक्ती, आकलनशक्ती व स्मरणशक्ती प्राप्त झाली आहे. त्यामुळे ज्यांचे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र आहे त्यांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनिष्ट होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक त्रास, अन्य कटकटी, हातील घेतलेल्या कार्यात अपयश अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत रवि, मंगळ व बुध असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. त्या स्थानी केतू आहेच. त्याच्यामुळे काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात

प्रतिकुल होईल आणि त्यामुळे मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम या व्यवसाय स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व अनेक लाभदायक घटना घडतील. भाग्यस्थानी असलेला दुसरा ग्रह मंगळ मानहानीकारक होईल व त्याच्यामुळे प्रवासात मनस्ताप सहन करावा लागेल. तसेच या राशीच्या भाग्यस्थानी असलेला तिसरा ग्रह बुध प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे भांडणे, कार्यदिरंगाई, अन्य अडचणी, अडथळे यांच्याशी मुकाबला करावा लागेल. या राशीच्या लाभस्थानी धनु राशीत शुक्र असून त्याच्यामुळे सतत मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी मकर या स्वराशीत शनि असून त्याच्या सोबत गुरु ग्रहही आहे. हा गुरु दिनांक २१ पासून या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहे. व्यय स्थानी असलेला शनि प्रतिकुल होईल व त्यामुळे अनारोग्य होणे, मानहानी होणे, सतत अडथळे, अडचणींना तोंड द्यावे लागेल. काळ प्रतिकुल असल्यामुळे सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने, काळजीपूर्वकच करा. गुरु अध्यात्म व सामाजिक कार्य यांची आवड असणारांना अनुकुल होईल. पण त्याच्यामुळे अपेक्षाभंग होणे, संततीविषयक समस्येचा मनस्ताप सहन करावा लागेल. येथील गुरु या राशीच्या प्रथम स्थानी गेल्यावर शुभ घटना घडतील. आरोग्य सुधारेल, बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व या राशीच्या लेखकांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या प्रथम स्थानी प्रथमपासून वक्री नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे मनस्थिती अतिशय कोमल होईल व संवेदना अति जलद होतील. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. . म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी 'ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी " ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या धनस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे मनस्थिती अति अस्थिर होईल व अविचाराने विचित्र आचरण होईल. आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा

अपमान होईल. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे मन उदार होईल, स्वभाव हरहुन्नरी होईल व हातून कर्तृत्व घडेल. पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत रवि ,मंगळ व बुध हे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात हा रवि प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे अनारोग्य, दुःख, अपयश, संततिसुखात बाधा, मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध अशापैकी घटना घडणे संभवते. मंगळ ग्रहही प्रतिकुल असून त्याच्यामुळे उष्णताविकार बळावतील, हाडमोड होणेही संभवते. त्याशिवाय त्याच्यामुळे पाण्यापासून धोका असून विष भयही आहे. जपा. पण बुध ग्रह अनुकुल असून त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल, यश मिळेल व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या भाग्यस्थानी केतू आहेच. त्याच्यामुळे ढोंगी आचरण होईल, संततिसुखात बाधा येईल. जपा. या राशीच्या दशम स्थानी धनु राशीत शुक्र असून त्याच्यामुळे स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होतील. मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत शनि असून सोबत गुरु ग्रहही आहे. हा शनि सर्वसाधारणपणे शुभ असून त्याच्यामुळे अर्थलाभ होणे संभवते. पण संततीपैकी कोणास काही विशेष मनस्ताप होणे संभवते. त्यामुळे संततिसुखात बाधा निर्माण होईल. येथील गुरुमुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, अनेक मार्गांनी धनलाभ होईल, वाहनसुख मिळेल, नवे मित्र मिळतील, विवाहेच्छूना विवाहयोग येईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा गुरु या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत जात आहे. त्या स्थानी प्रथमपासून वक्री नेपच्यून आहेच. त्याच्यामुळे चिंता, मानसिक व्यग्रता त्रस्त करतील व नैराश्य येईल. पण तो गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. महिन्याच्या अखेरच्या दहा दिवसांत गुरुमुळे अध्यात्म, समाजसेवा अशा गाष्टींची आवड असणारांना त्यांच्या कार्यात प्रगति करणे शक्य होईल. पण त्याच्यामुळे प्रवासात त्रास होईल व कौटुंबिक सुखात बाधा येईल. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====oooooooooooo=====